# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक १९/०६/२०१८**

## १) जबरी चोरी :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक १७.०६.२०१८ रोजी चे २१.०० वा. चे सुमारास कौठा येथील यशोसाई हॉस्पीटल कमानी जवळ, नांदेड येथे, यातील फिर्यादी हा त्याची कार क्रमांक एम.एच.१०/जी.जी.व्ही.८११८ नांदेड ते सिडको येथे कामानिमीत्त जात असताना अज्ञात चार चोरटयांनी पेशंट-पेशंट असे ओरडल्याने फिर्यादीने गाडी थांबविली असता यातील आरोपीतांनी जबर मारहाण करुन फिर्यादी जवळील सोन्याचे लॉकेट अंदाजे किंमत ४५,०००/- रुपये एक विवो कंपनीचा मोबाईल अंदाजे किंमत ६,५००/- रुपये तसेच ए.टी.एम.कार्ड व मारोती कार अंदाजे किंमत २,००,०००/- रुपये असा एकुण २,५१,५००/- रुपयाचा माल जबरीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी दिपेशसिंह पि.चुन्नुसिंह हजारी, वय ४२ वर्ष, व्यवसाय व्यापार, रा.तारासिंह मार्केट, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे.नांदेड ग्रामीण** गुरनं २५७/२०१८ कलम ३९४ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/मोरे, मो.क्र.९५९५१५८५१५** हे करीत आहेत.

## २) हयगयीने वाहन चालवुन मरणास कारणीभुत (अपघात) :-

**अ) किनवट :-** दिनांक १७.०६.२०१८ रोजी चे १९.३० वा. चे सुमारास, थारा ते धानोरा जाणारे रोडवर, ता.किनवट जि.नांदेड येथे यातील **मयत नामे १) चांगदेव लक्ष्मण वागतकर, वय २२ वर्षे व्यवसाय मजुरी रा.धानोरा,ता.किनवट जि. नांदेड २) साईनाथ सुधाकर मिरासे, वय १७ वर्ष व्यवसाय शिक्षण रा.थारा, ता.किनवट जि.नांदेड** हे ॲटो क्रमांक एम.एच.२६/के.४७६७ मध्ये बसुन प्रवास करित असतांना यातील ॲटो व ट्रक्टर चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन समोरा-समोर धडक देवुन यातील मयताचे मरणास कारणीभुत झाले. वगैरे **फिर्यादी नामदेव लक्ष्मण वागतकर, वय ५५ वर्षे व्यवसाय शेती रा.धानोरा, ता.किनवट जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे.किनवट** गुरन १२६/२०१८ कलम २७९, ३०४ (अ), भादंवि सह कलम १८४ मो.वा.का.प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/कांबळे, मो.क्रं. ९०९६२५४३५८** हे करीत आहेत.

**ब) अर्धापुर :-** दिनांक १७.०६.२०१८ रोजी चे १९.३० वा. चे सुमारास, अर्धापुर ते तामसा जाणारे रोडवर मुजा नाला जवळ हमरापुर शिवार, ता.अर्धापुर जि.नांदेड येथे यातील **मयत नामे भिमराव नारायण लोणे, रा.लोण (खु), ता.अर्धापुर जि.नांदेड हा** त्याची मोटार सायकल थांबवुन मित्रास बोलत असतांना यातील ट्रक क्रमांक एम.एच.२६/ए.डी.१३९६ चे चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला समोरुन जोराची धडक देवुन यातील मयताचे डोक्यास गंभीर मार लागुन मरणास कारणीभुत झाले व फिर्यादीस जखमी केले. वगैरे **फिर्यादी नागसेन बापुराव लोणे, वय ३० वर्षे व्यवसाय नौकरी रा.लोण (खु), ता.अर्धापुर जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे.अर्धापुर** गुरन १२१/२०१८ कलम २७९, ३०४ (अ), ३३७, ३३८, भादंवि काद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/जामोदकर, मो.क्रं. ९८२३८९५०७७** हे करीत आहेत.

## ३) बेकायदेशिररीत्या गावठी हातभट्टी दारू बाळगुन मिळुन आला :-

**उमरी :-** दिनांक १८.०६.२०१८ रोजी चे १८.३० वा. चे सुमारास, कारला तांडा आरोपीचे राहते घराजवळ मक्याचे शेतात, ता.उमरी जि.नांदेड येथे यातील आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या १२ लिटर हातभट्टीची गावठी दारु अंदाजे किंमत १,२००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोना/१९८२ गणपत संभाजी सरोदे, पो. स्टे.उमरी** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.उमरी** गुरन ०९/२०१८ कलम ६५ (ई) महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/१९८२ गणपत संभाजी सरोदे, मो.क्र. ९८५०७५२२८८** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७